तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य ,
३, महापालिका मार्ग , पत्र पेटी क्र. १९६७,मुंबई ४०० ००१.

क्रमांक - २/ एनजीसी/०२९९/ ७० ( ०९
दिनांक - / -5 OCT 1999

प्रति,

अध्यक्ष,
आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ,
उस्मानाबाद.

विषय - आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के.टी.कॉलेज ऑफ फार्मसी , उस्मानाबाद या खाजगी संस्थेस सन १९९९-२००० पासून औषध निर्माणशास्त्रपदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात शासनाने शासन निर्णय क्र.पीसीआय-१०९९/( ५१६/९९)तांशि-१दि. ६-९-९९ अन्वये आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे कें.टी.पाटील कॉलेज ऑफ फार्मसी उस्मानाबाद या खाजगी संस्थेत शैक्षणीक वर्ष १९९९-२००० पासून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास मान्यता दिली आहे. नवीन संस्था सुरु करण्यासाठी शासननिर्णय १९/८/९८ मध्ये नमूद केलेल्या अटीप्रमाणे संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांच्या संयुक्त खात्यात प्रथम वर्षासाठी रु.५.००/- लाख नियतठेव म्हणून राष्ट्रीयकृत बँकेत किंवा शेडयुल बँकेत पाच वर्ष मुदतीसाठी ठेव ठेवणे आवश्यक आहे तथापी आपण आपले पत्र क्र.ए.एस.पी.एम./२२२/९९ दि.५/१०/९९ अन्वये, सदर नियतठेव संयुक्त खात्यात जमा करण्यासाठी नोव्हेंबर ९९ पर्यंत मुदतवाढ मिळण्यासाठी विनंती केलेली आहे.

तरी आपली विनंती मान्य करुन कळविण्यात येते की, ३० नोव्हेंबर ९९ पर्यंत आपण सदर नियतठेव संयुक्त खात्यात जमा करुन त्याची मुळ पावती या कार्यालयास सादर करावी. आपण नोव्हेंबर अखेर पर्यंत नियतठेव जमा कराल या अटीवर आपल्या संस्थेत शै.वर्ष १९९९-२००० मध्ये प्रवेश करण्यास मंजूरी देण्याचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

Maharashtra University of Health Sciences Nashik

( प्र . ह . क्षीरसागर )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण म.रा. मुंबई.

प्रत- १) कुलसचिव,महाराष्ट्र आरोग्य विदयापीठ ,गंगापूररोड,नाशिक.यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
२) सहसंचालक,तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय औरंगाबाद यांना माहितीसाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :- २/एनजीसी/निबतठेव/२०१०/९१३८
दिनांक : 30 SEP 2010

प्रति,

प्राचार्य,

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे

के.टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी,

पा.ऑ.५६, सिद्धार्थ नगर,,

बार्शी रोड ४१३५०१

विषय : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्त्वावर नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१०/(१८८/२०१०)/तांशि-४, दि. ३० जुलै २०१० .

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शासनाने संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे, आपणास शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासुन नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व प्रवेशक्षमता बदल करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता | नियतठेवीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एम.फार्म (क्वालिटी अश्यु.) | १८ | रु.२.००लाख |
| २. | एम.फार्म (फार्मास्युटिक्स) | १८ | रु.२.०० लाख |

सदर अभ्यासक्रमासाठी संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात नॅशनलाईज किंवा शेड्युल बँकेत रु. ४.००लाख नियत ठेव ५ वर्षांसाठी ठेवण्यात करावी. **(तसेच सदर एफ.डी.मध्ये नांवासमोर (MPH-V-10) हा कोड नमुद करण्यात यावा.)** तसेच रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास तात्काळ सादर करावे. (सोबत हमीपत्राच्या नमुन्याची प्रत सोबत जोडली आहे.) सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यासाठी खाली नमुद केलेल्या बाबींची पुर्तता केल्याबाबतची माहिती कागदपत्रांच्या प्रतींसहीत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

१. वरील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची माहिती खालील नमुन्यात उपरोक्त रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवरील हमीपत्रात समाविष्ट करण्यांत यावी.

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव | शैक्षणिक अर्हता | पदनाम | नियुक्तीचा दिनांक | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेचे पत्र, शासन मान्यतेचे पत्र, विद्यापीठाचे मान्यता पत्र इत्यादी पत्रांच्या प्रती.

३. सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या सर्व शिक्षक कर्मचा-यांची नियुक्ती पत्रे राजू

[illegible]बाबतच्या पत्राच्या प्रती तसेच पदवी/पदव्युत्तर पदवी/पी.एच.डी.अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाची गुणपत्रिका व प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती.

४. सदर अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यांत आलेल्या पुस्तकांची यादी व त्याबाबत पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या पावत्यांचा क्रमांक, एकूण रक्कम यांची एकत्रित यादी.

| अ.क्र | पुरवठादाराचे नांव | खरेदी बिलाचा क्रमांक, दिनांक व रक्कम | पुरवठादाराला रक्कम अदा केलेल्या बिलाचा क्रमांक व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

५. सदर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारे संगणक व त्यासंबंधीची यंत्रसामुग्री तसेच फर्निचर याबतची [illegible] यादी व पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या पावत्यांचा क्रमांक, एकूण रक्कम यांची एकत्रित यादी.

| अ.क्र | पुरवठादाराचे नांव | खरेदी बिलाचा क्रमांक, दिनांक व रक्कम | पुरवठादाराला रक्कम अदा केलेल्या बिलाचा क्रमांक व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

६. संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्यासाठी बँकेचा फॉर्म व नमुना स्वाक्षरी फॉर्म सादर करावा.

७. सदर अभ्यासक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची संलग्नता घेणे आवश्यक आहे. विद्यापीठाची संलग्नता नसल्यास सदर पदवी अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. संलग्नता पत्राची प्रत सोबत जोडण्यात यावी.

वरील बाबींची माहिती सादर केल्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करण्याची या संचालनालयाची अंतिम परवानगी देण्यात येईल.

( डॉ.व्ही.एम.मोहितकर )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा.कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना मानार्थ सादर त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त रक्कम संचालकांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याची खात्री केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे एनरोलमेंट करु नये.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीसाठी सादर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०१७/ ८०५५

दिनांक : 07 JUN 2017

प्रति,
प्राचार्य,
आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे,
के.टी.पाटील कॉलेज ऑफ फार्मसी,
पो.ऑ. ५६, सिध्दार्थ नगर,
बार्शी रोड, उस्मानाबाद - ४१३ ५०१

**(डीटीई कोड २१५१)**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांचे पत्र क्र. ५०-२४९/२०१६-पीसीआय/५१७४५-४९ दि. १७.११.२०१६

२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१७/प्र.क्र.१३९/तांशि-४, दि. २० एप्रिल २०१७.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता | नियतठेवीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | फार्म.डी. | ००-३० | रु. ४.५० लाख |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केले आहे. तसेच आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु.४.५० लाख पावती क्र.५५०३५१ दि.०५.०५.२०१७ अन्वये युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा - उस्मानाबाद, येथे संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे अभ्यासक्रम सुरु करण्यास व विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहीत पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/वास्तुकला परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.


K. T. Patil College of Pharmacy
Osmanabad.
Inward No. 9722
Date 09/06/2017
Signature of Inward Clerk

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमांक व पासवर्डद्वारे** शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. शासनाने, या संचालनालयाने, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया , नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली/वास्तुकला परिषद, नवी दिल्ली फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त तसेच संदर्भीन शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

( चंद्रशेखर ओक भा.प्र.से. )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत -

१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. **कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
6. निवड नस्ती.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, ३०२३३४४२/४३ फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashta.gov.in


क्रमांक : २/एनजीसी/फार्मसी/मान्यता/२०१८/ 648
दिनांक : 22 JUN 2018

प्रति,
प्राचार्य,
आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
के.टी.पाटील कॉलेज ऑफ फार्मसी,
सिध्दार्थ नगर ,बार्शी रोड,
उस्मानाबाद-४१३५०१

(डीटीई सांकेतांक २१५१)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर विद्यमान संस्थेमध्ये सुरु असलेल्या औषधनिर्माणशास्त्र पदवि अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ सुरु करण्याबाबत.

संदर्भ :१.अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र वेस्टर्न/१-३५०८४२७०८२/२०१८/ईओए दि. १० एप्रिल, २०१८.
२.शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र.१९९/तांशि-४, दि. ०४ जून, २०१८.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर विद्यमान संस्थेमध्ये सुरु असलेल्या औषधनिर्माणशास्त्र पदवि अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | बी. फार्मसी | ६०-१०० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब " या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना अनुदान तत्वावर विद्यमान संस्थेमध्ये सुरु असलेल्या औषधनिर्माणशास्त्र पदवि अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु १.५० **लाख पावती क्र.२५४८४६** दि. **१२.०६.२०१८**, अन्वये **सोलापूर जनता सहकारी बँक लि.सोलापूर , शाखा-उस्मानाबाद**, येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे विद्यमान संस्थेमध्ये सुरु असलेल्या



K. T. Patil College of Pharmacy
Osmanabad.
Inward No. 9961
Date 25/06/2018
Signature of Inward Clerk

औषधनिर्माणशास्त्र पदवि अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ सुरु करण्यास व संबधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. शासनाने, या संचालनालयाने, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना राहतील.

४. औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संदर्भात फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
३. कार्यासन क्र. २अ मुख्य कार्यालय, मुंबई.
४. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई
६. निवड नस्तीस.